## नियमित दिवाणी दावा क्र. ४७६/२०१६ मधील निशाणी क्र. ४५ कडील अर्जावर आदेश

१) अर्ज वाचला. निशाणी क्र. ४८ कडे दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही पक्षातील विद्वान वकीलांना ऐकले. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, दिनांक २१/१९/२०२४ रोजी वादी वर्षा अतुल कुलकर्णी यांच्या निशाणी क्र. १६अ कडील जादा सरतपासाच्या शपथपत्रावरील उलटतपासासाठी प्रतिवादीला व त्यांच्या विद्वान वकीलांना पुकारले असता गैरहजर असल्याने प्रतिवादीतर्फे वादीचा उलटतपास नाही असा आदेश निशाणी क्र. १६अ खाली पारीत करण्यात आला आहे. प्रकरणाचे स्वरुप व अर्जातील नमूद कारणे विचारात घेता माझ्या मते प्रतिवादीने वादीला खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर प्रतिवादीला वादीचा उलटतपास घेण्याची संधी देवुन प्रस्तुतचे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निकाली काढणे न्यायाचे व उचित आहे. त्यामुळे वरील नमुद कारणांमुळे माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज खर्चाच्या अटीवर मंजुर करणे न्यायाचे व उचित आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१) प्रतिवादीने वादीला रक्कम रुपये ५००/- (अक्षरी पाचशे रुपये फक्त) इतकी खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो व त्यानुसार वादी वर्षा अतुल कुलकर्णी यांच्या निशाणी क्र. १६अ कडील जादा सरतपासणीच्या प्रतिज्ञापत्राखाली दि. २१/०९/२०२४ रोजी प्रतिवादीविरुद्ध पारीत केलेला 'उलटतपास नाही' हा आदेश रद्द करुन प्रतिवादीला निशाणी क्र. १६अ कडील

जादा सरतपासावर वादीचा उलटतपास घेण्यास परवानगी देण्यात येते.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2025.01.16 15:12:21 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक– १५/०१/२०२५ २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.